नि.दि.दा.क्र.४०९/२०१६
नि.क्र.७३

प्रतिवादी क्र.१,२,४ ते ६ करीता सा.क्र.३

वादीकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.यु.एस.जाधव यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू

१४. सर्वे क्र.१९ ची माझ्या समक्ष केव्हाही मोजणी झालेली नाही. सर्वे क्र.१९ चे एकूण क्षेत्रफळ मला माहित नाही.

प्रश्न- सर्वे क्र.१९ चे किती भाग पडले हे तुम्हाला माहित आहे का ?

उत्तर- त्याचा फक्त सर्वे क्र.१९/अ एवढाच भाग आहे.

१५. दसरू मुळे हे मी १० ते १२ वर्षे वयाचा असताना मयत झाले. दसरू मुळे हयात असताना त्यांच्या ताब्यात किती जमीन होती हे दर्शविणारा मोजणीचा अभिलेख मी पाहिलेला नाही. दसरू मुळे यांना ईतर तीन भाऊ आहेत. माझे वडिल हे दसरू मुळे यांच्या ईतर तीन भावांपैकी एक आहेत. दसरू मुळे व त्यांच्या भावांमध्ये वाटपाचा दस्त झाला होता किंवा कसे हे मला माहित नाही, साक्षीदार स्वत: सांगतात त्याबाबत तोंडी माहिती आहे. दसरू मुळे व त्यांच्या ईतर भावांमध्ये कोणत्या तारखेस वाटप झाले ते मला माहित नाही. ते वाटप लेखी होते किंवा तोंडी होते तेही मला माहित नाही. दसरू मुळे व त्यांच्या ईतर तीन भावांमध्ये एकूण किती जमीनीची वाटणी झाली हे मला माहित नाही. ७/१२ नोंदीबाबत दसरू मुळे अथवा माझे आजोबा दौलू यांनी दुरूस्तीसाठी काही कार्यवाही केली किंवा कसे हे मला माहित नाही. मी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला आहे. ७/१२ उता-यावर दसरू मुळे व त्यांच्या वारसांच्या नावे ५१ आर क्षेत्र आहे हे म्हणणे खरे आहे. माझे वडिल अंगद दौलू मुळे यांना देखील सर्वे क्र.१९/अ मध्ये ५१ आर क्षेत्र होते. सर्वे क्र.१९/अ च्या चतु:सिमेस मला जमीन नाही. दाव्याबाबत मला माहिती आहे. वादी यांच्या नावे सर्वे क्र.१९/ब मध्ये ५१ आर क्षेत्र आहे. दावा मिळकतीच्या उत्तरेस गाडी रस्ता आहे हे म्हणणे खरे आहे. वादीच्या ५१ आर क्षेत्राच्या पूर्वेस लहान ओहोळ आहे हे म्हणणे खरे आहे. दावा मिळकतीच्या पश्चिमेस प्रतिवादी यांच्या जमीनी आहेत हे म्हणणे खरे आहे. वादी यांच्या जमीनीच्या दक्षिणेस अभिमन्यूचे क्षेत्र आहे व अभिमन्यूच्या पश्चिमेस प्रतिवादीचे क्षेत्र

आहे हे म्हणणे खरे आहे.

१६. सन-२०१६ साली वादी व प्रतिवादी मध्ये झालेल्या वादाची मला माहिती आहे. दि.११/०४/२०१६ रोजी वादी व प्रतिवादीमध्ये अतिक्रमणाबाबत वाद होता हे म्हणणे खरे आहे. त्यानंतर त्या वादामुळे पोलीस ठाण्यात तक्रारी जाण्यापर्यंत घडले हे म्हणणे खरे आहे. पोलीसांनी मोजणी करा असे सांगितले हे मला माहित नाही. माझे प्रतिवादींसोबत भांडण व तक्रार नाही. प्रतिवादींचा फायदा व्हावा म्हणून मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. मी खोटा सरतपास दाखल केला हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण**.

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.07.03 17:52:27 +0530

(रवि वि.पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर

दिनांक ०३/०७/२०२५.